**प्रसिध्दी पत्रक** दिनांक ०५/०३/२०२४

आरोपी लोकसेवक- श्री. विनोद रामचंद्र काळे, वय 42 वर्षे, पद- भूमापक (वर्ग-3) नेमणुक- उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय कन्नड ता. कन्नड जिल्हा-छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून 39500/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे कन्नड शहर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री. विनोद रामचंद्र काळे, वय 42 वर्षे, पद- भूमापक (वर्ग-3) नेमणुक- उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय कन्नड ता. कन्नड जिल्हा-छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | :- | 80000/-रुपये. पैकी 40,500/-रुपये शासकीय शुल्क म्हणुन आणि उर्वरीत 39,500/- लाच रक्कम. |
| लाच स्विकृती रक्कम | | 80000/-रुपये. पैकी 40,500/-रुपये शासकीय शुल्क म्हणुन आणि उर्वरीत 39,500/- लाच रक्कम. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. नंदकुमार क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे मालकाचे मौजे चापानेर ता. कन्नड, येथील शेत गट नं. 5 मधील जमीन अकृषीक करण्याचे कामासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांचे मालकाचे मौजे चापानेर ता. कन्नड, येथील शेत गट नं. 5 मधील जमीन अकृषीक करण्याचे कामासाठी.आरोपी लोकसेवक श्री. विनोद काळे यांनी तक्रारदार यांच्याकडे 80000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.05/03/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष एकुण 80000/-रुपये मागणी केली त्यापैकी वरील जमीन मोजणीची शासकीय फीस 40,500 रुपये व उर्वरीत लाचेची रक्कम 39,500/-रुपये असे एकूण 80000 रुपये लाचेची मागणी केली बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आज दि. 05/03/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. विनोद काळे यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारासमक्ष उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय कन्नड ता. कन्नड येथे रुपये 80000/- लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन कन्न शहर, छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नंदकुमार क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार अशोक नागरगोजे, राजेंद्र सिनकर, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103

पोलीस उप अधीक्षक :- 9823498777


**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.